महाराष्ट्र सत्यमेव जयते शासन

# महिला व बाल विकास आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-१.

२८ राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस जवळ, महाराष्ट्र राज्य, पुणे- ४११००१.
ई-मेल dy.commissionercdc@gmail.com दुरध्वनी क्रमांक ०२०-२६३३०३७४

जा.क्र. मबाविआ/बावि/का-५/बा.ह.आ.जाहिरात/२०२४-२५/ पुणे ४५४४ दि.१६ जुर्ले, २०२५

प्रति,

**मा.महासंचालक**
माहिती व जनसंपर्क महासंचालनाय
G.T. हॉस्पीटल समोर, ६वा मजला,
नवीन मंत्रालय इमारत, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई -३२

**विषय :- महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांच्या नियुक्ती करणेबाबतची जाहिरात वर्तमानपत्रात प्रसिध्द करणेबाबत... (महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हे एकुण-३६)**

**संदर्भ:-** शासन पत्र क्र. बैठक-२०२५/प्र.क्र.३५/का-९ दिनांक ११/०७/२०२५.

उपरोक्त विषयान्वये, दिनांक ०१ जुर्ले, २०२५ रोजी मा.मंत्री (महिला व बाल विकास) यांचे अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगावरील अध्यक्ष व सदस्यांची निवडीच्या अनुषंगाने बैठक आयोजित करण्यात आली होती त्यावर चर्चा झाली . महाराष्ट्र बालहक्क संरक्षण आयोगावरील अध्यक्ष व सदस्य या पदांवरील निवडीसंदर्भात निवेदने/अर्ज स्वीकारण्याची मुदत संपली असली तरीही, अद्यापही विविध माध्यमातुन यासाठी निवेदने/अर्ज प्राप्त होत आहेत. ही बाब लक्षात घेता आणखी संधी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने निवेदने/अर्ज स्वीकारण्यासाठी ७ दिवसांची मुदत वाढवून देण्यात यावी असे निर्देश मा. मंत्री महिला व बाल विकास यांनी दिले आहेत.

त्यानुसार या संबंधीची अध्यक्ष व सदस्य निवड करुन घेणे बाबतची जाहिरात या पत्रासोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

आपणास विनंती करण्यात येते की, सदरहू जाहिरात वर नमुद जिल्हयात सर्वाधिक खपाचे दोन वर्तमानपत्रातून (मराठी) प्रसिध्द करावी.

| | | |
|---|---|---|
| १ | **कार्यालयाचे नाव :-** | महिला व बालविकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, २८ राणीचा बाग, पुणे -१. |
| २ | **जाहिरात प्रसिध्दीचा दिनांक :-** | 17/7/2025 |
| ३ | **बील कोणाकडे पाठवावे :-** | महिला व बालविकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, २८ राणीचा बाग, पुणे -१. |
| ४ | **जाहिरातीचे स्वरुप :-** | **महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगावर अध्यक्ष व सदस्य यांची नियुक्ती करणेबाबत...** |
| ५ | **क्षेत्र :-** | महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हे (एकुण-३६) |

| | | |
|---|---|---|
| ६ | **किती वर्तमानपत्रा मध्ये प्रसिध्द करण्यात यावी :-** | वर नमूद जिल्हयातील प्रमुख वृत्तपत्रांमध्ये, जिल्हा, तालुका स्तरावरील व्यक्तींनाही या जाहिरातीची माहिती होण्याच्या दृष्टीने त्या जिल्हयातील अग्रगण्य असणा-या मराठी प्रामुख्याने दैनिकांत (लोकसत्ता, लोकमत, सकाळ, पुढारी, महाराष्ट्र टाईम्स) (स्थानिक वर्तमानपत्रात) |
| ७ | **जाहिरात कितीवेळा प्रसिध्द करावयाची आहे :-** | एकवेळा |
| ८ | **नामांकन सादर करावयाचे ठिकाण :-** | आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, २८ राणीचा बाग,जुन्या सर्कट हाऊस जवळ, पुणे-१. |

**सोबत :- जाहिरातीचा मसुदा.**

(नयना अर्जुन गुंडे) भा.प्र.से.
आयुक्त
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत** - मा.सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

## जाहिरातीचा नमुना

**महाराष्ट्र शासन**

**महिला व बाल विकास विभाग**

बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम २००५ च्या कलम १७ व १८ मधील तरतुदीनुसार व बाल हक्क संरक्षण राष्ट्रीय आयोग नियम, २००६ मधील दि.२४/०३/२०१४ व दि.०६/०५/२०१४ च्या दुरुस्तीमध्ये नमूद निकषांचा समावेश करुन महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगावर अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी राज्यातून नामांकने मागविण्यात येत आहेत. अर्ज स्वीकारण्यासाठी ७ दिवसांची मुदत देण्यात यावी.

- **अध्यक्ष : एकूण पद-१ प्रतिष्ठित व्यक्ती व बालकांच्या कल्याण व विकासाशी निगडीत अतिउत्कृष्ठ कार्य करणारी व्यक्ती असावी.**
- **सदस्य : एकूण पदे-६ (यापैकी किमान २ महिला)**

**(दोन वेळा अध्यक्ष/ सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्यात आलेली व्यक्ती पुन्हा नामनिर्देशनासाठी पात्र रहाणार नाही.)**

- मानवी हक्क व बाल हक्काचे उल्लंघन करणारी व्यक्ती नियुक्तीस पात्र रहाणार नाही.
- अध्यक्ष/सदस्य यांचा नियुक्ती कालावधी ३ वर्षाकरीता राहील तथापि **अध्यक्ष हे वय वर्ष ६५ नंतर अध्यक्ष पद धारण करु शकणार नाही तसेच सदस्य हे वय वर्षे ६० नंतर सदस्य हे पद धारण करु शकणार नाही.**
- शैक्षणिक अर्हता -किमान पदवीधर

वर नमूद केलेल्या पदांसाठी दिलेल्या अटींची पुर्तता करणा-या इच्छूक व्यक्तींनी आपले खालील विहित नमुन्यातील अर्ज वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव आणि इतर तत्सम कागदपत्रासह जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसाचे आत आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, २८- राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस जवळ, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांच्या कार्यालयात सादर करावे. तसेच सदरची सविस्तर जाहिरात शासनाच्या www.maharashtra.gov.in व आयुक्तालयाच्या www.wcdcommpune.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(नयना अर्जुन गुंडे) भा.प्र.से.
आयुक्त
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य, पुणे

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगातील अध्यक्ष व सदस्य यांची नियुक्ती करणेबाबत इच्छुक व्यक्तीची नामनिर्देशन करण्यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज.

---

| पासपोर्ट आकाराचा फोटो |
|---|

१. नाव:

२. लिंग (पु./म.)

अ) पुरुष

ब) महिला

३. जन्मतारीख (वय):

४. संपूर्ण तपशील :

| निवासी | | कार्यालयाचा | |
|---|---|---|---|
| पुर्ण पत्ता | दूरध्वनी क्रमांक आणि फॅक्स (असल्यास) | पुर्ण पत्ता | दूरध्वनी क्रमांक आणि फॅक्स (असल्यास) |

५. मोबाईल क्रमांक :

६. ई-मेल आय डी :

७. राष्ट्रीयत्व :

८. कोणत्या पदासाठी अर्ज करण्यात येत आहे :

अ) पुरुष

ब) महिला

**खालील नमुद विषयामधील आपले कार्यक्षेत्र/ अनुभव निवडा.**

- **शिक्षण**
- **बालकांच्या कल्याण व विकासाशी निगडीत अतिउत्कृष्ट कार्य केलेबाबत**
- **बालकांचे आरोग्य, काळजी, कल्याण किंवा विकास**
- **बालन्याय क्षेत्रातील किंवा दुर्लक्षित, उपेक्षित मुलांची काळजी किंवा अपंग मुलांचे क्षेत्र**
- **बाल कामगार प्रथा निमूर्लनाचे क्षेत्र किंवा त्रासात असलेल्या बालकांबाबत**
- **बाल मानसशास्त्र किंवा समाजशास्त्र**
- **बालकांच्या कायद्याविषयीचे क्षेत्र**

९. शैक्षणिक पात्रता (तुम्हाला अधिक जागेची आवश्यकता असल्यास, कृपया याच फॉरमॅटमध्ये स्वतंत्र पत्रके जोडा) : **पदवीधर**

| अ.क्र | पदवीचे नाव (तुमच्या प्रमाणपत्रावर नमूद प्रमाणे) | विद्यापीठ/ ठिकाण | कालावधी | | मुख्य अभ्यासक्रम | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | कधी पासून | कधी पर्यंत | | |

१०. संक्षिप्त सेवा तपशील (जर तुम्हाला अधिक जागेची आवश्यकता असेल, तर कृपया याच फॉरमॅटमध्ये स्वतंत्र पृष्ठ संलग्न करा.

| पदनाम | संस्थेचे नाव | कालावधी | | कामाचे संक्षिप्त वर्णन |
|---|---|---|---|---|
| | | कधी पासून | कधी पर्यंत | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |

११. उपरोक्त नमुद केल्या व्यतिरिक्त अतिरिक्त माहिती, जर असेल तर (कोणत्याही राष्ट्रीय किंवा राज्यस्तरीय मान्यता/पुरस्कार जिंकलेल्या/प्रकाशने/अनुभव/असाइनमेंटसाठी या बाबत माहिती द्यावयाची आवश्यक असल्यास अतिरिक्त पृष्ठे संलग्न करुन जोडा.

१२. तुम्ही ज्या पदासाठी अर्ज केला आहे, त्यासाठी तुम्ही सर्वोत्तम उमेदवार आहात असे तुम्हाला वाटते का? (कृपया 800 शब्दांपेक्षा जास्त नसलेला स्व-लिखित उत्तर संलग्न करा)

१३. समाजातील दोन प्रतिष्ठीत व्यक्तीचे नावे, पदनाम आणि संपर्क तपशील, जबाबदार (नातेवाईक नसणे), जे अर्जदाराच्या कामाशी परिचित आहेत.

| नाव | व्यावसायिक तपशील | संपर्क तपशील | | |
|---|---|---|---|---|
| | | पूर्ण पत्ता | ईमेल | दूरध्वनी क्र. फॅक्स (असल्यास) आणि मोबाईल क्र. |
| | | | | |

१४.मी घोषित करतो/करते की,

A) अर्जामध्ये दिलेली माहिती व सोबतची कागदपत्रे खरी योग्य आहेत.

B) माझ्यावर यापूर्वी तसेच सद्यस्थितीत कोणत्याही प्रकारे कायद्याचे उल्लंघन केल्याबाबत गुन्हा दाखल नाही अथवा मला अटक करण्यात आलेली नाही.

C) राज्य अथवा केंद्र शासनाच्या कोणत्याही सेवेतून व राज्य अथवा केंद्र शासनाच्या अधिनस्त कोणत्याही महामंडळे व्यवस्थापने यावरुन मला काढून टाकण्यात आलेले नाही.

D) जाहिरातीच्या दिवशी मी कोणत्याही राज्य/केंद्रशासित प्रदेश विधानमंडळाचा अथवा संसदेचा सदस्य नाही. तसेच कोणत्याही राजकीय पक्षाचा सदस्य नाही.

E) माझी नियुक्ती झाल्यास या पदाव्यतिरीक्त इतर कोणतेही लाभाचे पद मी या कालावधीमध्ये धारण करणार नाही.

ठिकाण:

तारीख :

(अर्जदाराची स्वाक्षरी)

सोबत जोडावयाची कागदपत्रे:

1. मानवी हक्क किया बाल हक्कांचे उल्लंघन केले नसल्याचे पोलीस विभागाचे चारित्र्य प्रमाणपत्र,
2. शैक्षणिक पात्रतेबातची पदवी/प्रमाणपत्रे/मार्कशिट इ. सर्व प्रमाणपत्रे
3. पासपोर्ट/निवडणूक ओळखपत्र/आधार कार्ड/ जन्माचा दाखला
4. नमूद सेवाक्षेत्रातील संबंधित संस्था/प्राधिकरणाचे सेवाविषयक अनुभव प्रमाणपत्र/दाखला